महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची हरेगाव मळ्यावरील मौजे हरेगाव, ता. श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर येथील १५०० एकर जमीन निबे ग्रुप कंपनी, मुंबई (Global Defence Industries Limited) यांना अकृषिक वापरासाठी भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग,
शासन निर्णय क्र. मशोम-२०२६/प्र.क्र.५०/ल-७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
पहिला मजला (मुख्य इमारत) मंत्रालय , मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६

संदर्भ:-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. मशोम-२०२४/प्र.क्र.४९/ल-७, दि.२३ जानेवारी, २०२६
२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. जमीन-२०२५/प्र.क्र.१३७/जमीन-०१, दि.०८एप्रिल, २०२६
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचे क्र. जमीन/हरिगांव मळा/ ज.मा./ २०२६/१३९८, दि.०३ ऑगस्ट, २०२६ रोजीचा अहवाल

प्रस्तावना:-

"हरेगाव मळ्यावरील शेती महामंडळाची जमीन शासनाचे हरित हायड्रोजन धोरण २०२३ नुसार झेडआरटू ग्रुप व्होल्डींग्झ लि., मुंबई कंपनीच्या Negative Net Zero SAF (Sustainable Aviation Fuel) Plant या प्रकल्पाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास ४९ वर्षे मुदतीकरीता भाडेकराराने उपलब्ध करुन देणे" या विषयाबाबत दिनांक ३१.१२.२०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार संदर्भीय क्र. १, दि.२३.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेण्याकरीता मा.मंत्री (महसूल), अध्यक्ष, मा. मंत्री (उद्योग) व मा. मंत्री (पर्यावरण) यांची मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.२३.०६.२०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये शेती महामंडळाचे हरेगाव मळ्यावरील हरेगाव येथील ब्लॉक क्रमांक (A) मधील १५०० एकर क्षेत्र निबे ग्रुप कंपनी, मुंबई यांना देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तद्नंतर सदर विषयाच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.०७.२०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेले निर्देश व प्रस्तुत प्रकरणी मा. मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ (मर्या.), पुणे यांनी संदर्भीय क्र. ३ अन्वये सादर केलेला अहवाल व सदर अहवालाच्या अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची हरेगाव मळा, जि. अहिल्यानगर येथील १५०० एकर जमीन संदर्भीय क्र. २ च्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून निबे ग्रुप कंपनी, मुंबई (Global Defence Industries Limited) यांना अकृषिक वापरासाठी भाडेपट्ट्याने देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची हरेगांव मळ्यावरील मौजे हरेगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथील ब्लॉक क्र. 1 (A) मधील १५०० एकर जमीन ई-निविदा प्रक्रिया न राबविता सरळ पध्दतीने प्रति वर्षी प्रति एकरी रक्कम रु. ५०,०००/- भाडेपट्टयाची किंमत देऊन प्रथम वर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दरावर (Base Rate) प्रत्येक वर्षी ३% सरळ पध्दतीने भाडेपट्टा दरात वाढ व ३ वर्षांची आगाऊ रक्कम महामंडळाकडे जमा करणेच्या अटीवर संदर्भीय क्र. २ च्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार प्रथमत: ४९ वर्ष व तद्नंतर कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन झालेले नसल्यास सदर भाडेपट्ट्याचे पून्हा ४९ वर्षापर्यंत शेती महामंडळाच्या त्यावेळच्या धोरणातील अटी व शर्ती व अटीच्या अधीन राहून नुतनीकरण करण्याच्या व शासनाच्या पूर्वपरवानगीने गहाण ठेवण्याच्या अधीन राहून निबे ग्रुप कंपनी, मुंबई (Global Defence Industries Limited) यांना अकृषिक वापराकरीता उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. मौजे हरेगाव येथील ब्लॉक क्र. 1 (A) मधील संयुक्त शेतीसाठी दिलेल्या (सुमारे ९०० एकर) जमिनीमधील सध्या उभे असलेले पिक काढल्यानंतर रिकामी झालेली जमिन मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयाच्या अधीन राहून निबे ग्रुप कंपनी, मुंबई (Global Defence Industries Limited) यांना महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने शासनाच्या मान्यतेने उपलब्ध करुन द्यावी.

३. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या करारनाम्यातील शर्ती व अटीनुसार, शेती महामंडळाच्या (AOC) आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत ३ वर्षाची आगाऊ रक्कम निबे कंपनी भरणार असल्याने सदर कंपनीस सुरक्षा ठेव महामंडळाकडे जमा करण्यातून सूट देण्यात येत आहे.

४. निबे ग्रुप कंपनी, मुंबई (Global Defence Industries Limited) यांना प्रकल्प उभारताना आवश्यक असलेल्या पूर्व परवानगी/ परवानगीकरिता शेती महामंडळाकडून ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) घेण्यापासून सूट देण्यात येत आहे.

५. निबे ग्रुप कंपनी, मुंबई (Global Defence Industries Limited) यांना भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीची भविष्यात महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडून विक्री करावयाची झाल्यास महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने निबे कंपनीस प्राधान्य द्यावे.

अटी व शर्ती

१. निबे ग्रुप कंपनी, मुंबई)Global Defence Industries Limited) हे सदर जमीन भाडेपट्टेदार या धारणाधिकाराने धारण करतील.

२. प्रस्तुत जमीन कंपनीने ज्या प्रयोजनासाठी धारण केली आहे त्याच प्रयोजनासाठी वापर करणे बंधनकारक राहिल.

३. राज्य शासनाच्या (महसूल विभागाच्या) पूर्वमान्यतेशिवाय विषयांकित महामंडळाची जमीन अथवा त्याचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबध हस्तांतरण, तारण/ गहाण ठेवता येणार नाही.

४. जमीनीचा ताबा मिळाल्यापासून २ वर्षाच्या आत मंजूर प्रयोजनासाठी वापर सुरु करण्यात यावा.

५. मंजूर आदेशातील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग झाल्यास उक्त जमीन शासन जमा करण्यास पात्र राहील व कंपनीस त्याचा मोबदला मागण्याचा हक्क राहणार नाही.

६. विषयांकित जमिनीवर संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विहीत परवानगीने व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास होणे बंधकारक राहील. तसेच या व्यतिरिक्त अन्य आवश्यक शासकीय विभाग/शासकीय यंत्रणा यांची मान्यता / पूर्वपरवानगी / ना-हरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

७. सदर जमिनीवर अतिक्रमण होणार नाही, याची पूर्णतः जबाबदारी निबे कंपनीची राहील.

८. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांना योग्य वाटतील त्या अन्य अटी व शर्ती घालण्याचा अधिकार राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२६०८१३११५९२६८०४८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2026.08.13 12:02:10 +05'30'

(सत्यनारायण बजाज)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२
८. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ (मर्या.), पुणे
१०.निवडनस्ती, कार्यासन ल-७,महसूल विभाग,मंत्रालय,मुंबई